## संक्षिप्त

### शिरूर बाजार समितीत उद्यापासून लिलाव बंद

**शिरूर, जि. पुणे :** सरकारने आधारभूत किमतीवरच शेतीमाल व अन्नधान्य खरेदीबाबत व्यापाऱ्यांवर निर्बंध घातले आहेत. त्याचा निषेध करण्यासाठी उद्यापासून (ता. २६) शेतीमालाचे लिलाव न करता व्यवहार बेमुदत बंद ठेवण्याचा निर्णय शिरूर बाजार समितीमधील व्यापाऱ्यांनी घेतला. शिरूर व्यापारी महासंघाचे उपाध्यक्ष संतोष भंडारी, बाजार समितीचे संचालक प्रवीण चोरडिया, मोतीलाल बरमेचा, सुनील गादिया, संतोष सुराणा, प्रकाश सुराणा, अजित ओस्तवाल, राजेंद्र दुगड आदींसह व्यापाऱ्यांच्या आज येथील बाजार समितीत झालेल्या बैठकीत उद्यापासून "बाजारपेठ बंद' चा निर्णय घेण्यात आला. शिरूर बाजार समितीचे सभापती शशिकांत दसगुडे यांना याबाबतचे निवेदन देण्यात आले. बाजार समितीचे संचालक विजेंद्र गद्रे व बंडू जाधव हे या वेळी उपस्थित होते.

### 'खडकवासला'चे पाणी देण्याची मागणी

**भवानीनगर, जि. पुणे :** शेतात उभी असलेली पिके जळून खाक झाल्यानंतरच पाणी मिळणार का? असा सवाल इंदापूर तालुक्यातील सपकळवाडी, तावशीसह इतर गावांतील शेतकऱ्यांनी केला आहे. खडकवासला उजव्या कालव्यातील पाणी मिळत नसल्याने मदनवाडीपासून तरंगवाडीपर्यंतची गावतळी कोरडी पडली आहेत. त्यांच्याप्रमाणेच तालुक्याच्या पश्चिम भागातील शेतकरीही पाण्याअभावी हवालदिल झाले आहेत. पावसाळा संपत आला तरी त्याचा थांगपत्ता नसल्याने शेतकरी चिंतेत आहेत. त्यातच भाटघर, वीर, नीरा देवघर ही धरणे पूर्ण भरल्यानंतर नीरा नदीत पाणी सोडण्यात आले आहे.

# जिल्ह्यातील ग्रामपंचायतींचा निवडणूक कार्यक्रम जाहीर

## २६ सप्टेंबर रोजी मतदान; सरपंचपदांच्या सहा रिक्त जागांसाठी फेरनिवडणूक

**पुणे (प्रतिनिधी) :** ऑक्टोबर २०१८ ते फेब्रुवारी २०१९ या कालावधीत मुदत संपणाऱ्या व नवनिर्मित ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे. जिल्ह्यातील ५९ ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुका तसेच ६ ग्रामपंचायतींच्या सरपंचपदाच्या रिक्त जागासाठी २६ सप्टेंबर रोजी मतदान होणार आहे. यात सदस्य पदांबरोबरच सरपंचपदाच्या थेट निवडणुकांचाही समावेश आहे.

या निवडणुकीसाठी आचारसंहिता लागू करण्यात आली असून, ५ ते ११ सप्टेंबर या कालावधीत उमेदवारी अर्ज स्वीकारले जातील. त्यांची छाननी १२ सप्टेंबर रोजी होईल. १५ सप्टेंबरपर्यंत उमेदवारी अर्ज मागे घेता येतील व त्याच दिवशी चिन्ह वाटप होईल. मतदान २६ सप्टेंबर रोजी सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० या वेळेत होईल. तर निवडणुकीची मतमोजणी २७ सप्टेंबर रोजी तालुक्याच्या ठिकाणी होणार आहे.



जिल्ह्यातील सार्वत्रिक निवडणूक होणाऱ्या ग्रामपंचायतींची नावे : म्हाळुंगे तर्फे घोडा, नांदूर, मांदळेवाडी, कुरवंडी, पोंदेवाडी, लाखणगाव (ता. आंबेगाव), कोळोली (ता. बारामती), हिर्डोशी, शिरगाव (ता. भोर), देलवडी, नाथाची वाडी, देऊळगाव राजे, वासुंदे, रोटी (ता. दौंड), शेळगाव, उद्धट, काळठण नं. १, खोरोची, कांदलगाव, अगोती नं. १, वडापुरी, तरटगाव, बोराटेवाडी, काळठण नं. २, ओगती नं. २, पवारवाडी, गोखळी, पंधारवाडी (ता. इंदापूर), गोरेगाव, भामळे, संतोषनगर, वाकी बुद्रुक, जऊळके खुर्द, कोहिंडे बुद्रुक, सोळू, वडगाव घेनंद, धामणे (ता. खेड), डोंगरगाव, तुंग, ठाकुरसाई, केवरे (ता. मावळ), जवळ, खरावडे, पिंपळेली (ता. मुळशी), खेंगरेवाडी-शिंदेवाडी, पांगारे, नवलेवाडी, चिव्हेवाडी, घेरापुरंदर-मिसाळवाडी (ता. पुरंदर), राजणगाव गणपती, आंबळे, चव्हाणवाडी, कळवंतवाडी, धानोरे, कर्डे, ढोकसांगवी (ता. शिरूर), भाटी वागदरा, आसनी दामगुडा, आसनी मंजाई (ता. वेल्हे).

रिक्त सरपंचपदासाठी पोटनिवडणूक होणाऱ्या ग्रामपंचायतींची नावे : सानवडी, करंजे, अशिंपी (ता. भोर), धुवेली (ता. खेड), आंबेगाव खुर्द, गिवशी (ता. वेल्हे).

# पुणे जिल्ह्यात श्रावणसरींची हजेरी; धरणांमधून विसर्ग सुरू

**पुणे (प्रतिनिधी) :** जिल्ह्यात पावसाचा जोर ओसरल्यानंतर ऊन सावल्यांच्या खेळात जोरदार पावसासह श्रावणसरी कोसळू लागल्या आहेत. शनिवारी सकाळपासूनच श्रावणसरींचा अनुभव येत आहे. शनिवारी सकाळपर्यंत जिल्ह्यात हलक्या ते मध्यम पावसाने हजेरी लावली असून, धरणांमधून पाण्याचा विसर्गही सुरूच आहे.

जिल्ह्याच्या पश्चिम भागात पावसाचा जोर अधिक असून मावळ, मुळशी तालुक्यांतील धरणांच्या पाणलोटामध्ये अधिक पाऊस पडत आहे. धरणातील पाण्याची आवक घटल्याने पाण्याचा विसर्ग कमी झाला असला तरी जवळपास सर्वच धरणांमधून कमी अधिक प्रमाणात पाणी सोडण्यात येत आहे. त्यामुळे नद्या दुथडी वाहत असून, दौंड येथे भीमा नदीपात्रात सुमारे ३५ हजार २१७ क्युसेक वेगाने पाणी वाहत असल्याने उजनीचा पाणीसाठ्याची शंभर टक्क्यांकडे वाटचाल सुरू आहे. शुक्रवारी रात्री खडकवासला धरणातून कमी केलेला विसर्ग शनिवारी (ता. २५) दुपारी पुन्हा वाढविण्यात आला. दुपारी २ वाजता धरणाच्या सांडवा आणि कालव्यातून सुमारे आठ हजार क्युसेक वेगाने पाणी सोडण्यात येत होते.

मुळशी धरणातून सहा हजार क्युसेक, भाटघर आणि वीर धरणातून प्रत्येकी सुमारे चार हजार क्युसेक वेगाने, तर डिंभे, चासकमान, भामाआसखेड, वरसगाव, गुंजवणी आणि भाटघर धरणांमधून दोन हजार क्युसेकपेक्षा अधिक वेगाने पाणी नदीपात्रांमध्ये सोडण्यात येत होते.

# सातारा जिल्ह्यातील ४८ ग्रामपंचायतींत रणधुमाळी

## ५ सप्टेंबरपासून उमेदवारी अर्ज भरण्यास सुरवात

**सातारा (प्रतिनिधी) :** ऑक्टोबर ते फेब्रुवारी २०१९ या कालावधीत मुदत संपणाऱ्या तसेच नव्याने स्थापन झालेल्या जिल्ह्यातील ४८ ग्रामपंचायतींची सार्वत्रिक व तीन ग्रामपंचायतींच्या पोटनिवडणुकांसाठी दि. २६ सप्टेंबरला मतदान होणार आहे. या निवडणुकांसाठी ५ सप्टेंबरपासून उमेदवारी अर्ज भरण्यास सुरवात होणार आहे.

कराड तालुक्यातील सर्वाधिक १६, खटाव तालुक्यात ९, वाई तालुक्यातील ७, पाटण तालुक्यात ६, महाबळेश्वर तालुक्यातील ५, कोरेगाव तालुक्यातील २, जावली तालुक्यातील २, माण तालुक्यातील एका ग्रामपंचायतींसाठी सार्वत्रिक निवडणूक होणार आहे. याशिवाय अन्य तीन ग्रामपंचायतींच्या पोटनिवडणुकाही होत आहेत. संबंधित ग्रामपंचायतींचे सरपंच व सदस्यपदासाठी थेट निवडणूक होत आहे. या निवडणुकीसाठी नामनिर्देशनपत्रे ता. ५ ते ११ सप्टेंबर या कालावधीत स्वीकारले जातील. त्यांची छाननी १२ सप्टेंबरला होईल. नामनिर्देशनपत्रे १५ सप्टेंबरपर्यंत मागे घेता येतील व त्याच दिवशी चिन्हवाटप होईल. मतदान २६ सप्टेंबरला सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० या वेळेत होईल. मतमोजणी २७ सप्टेंबरला होईल.

सकाळ अॅग्रोवन www.agrowon.com मित्र ग्लोबल शिवाराचा..
आयोजित
महाधन नजर ठेवा उद्यावर
प्रायोजित
सकाळ अॅग्रोवन संवाद

**'अॅग्रोवन' साधणार शेतकऱ्यांशी संवाद**

**कार्यक्रम वेळापत्रक**

**सोमवार, २७ ऑगस्ट २०१८ रोजी**

**विषय** – कांदा उत्पादन वाढीचे तंत्रज्ञान
**वक्ते** – **श्री. रामदास दरेकर** (तालुका कृषी अधिकारी)
**श्री. राकेश पाटील** (विक्री व्यवस्थापक, स्मार्टकेम टेक्नोलॉजीज लि.)
**स्थळ** – सावतामहाराज मंदिर सभागृह, पानोली, ता. पारनेर, जि. अहमदनगर
**वेळ** – सकाळी ८.३० वा.

**या मार्गदर्शन मेळाव्याचा आपण व आपल्या शेतकरी मित्रांनी अवश्य लाभ घ्यावा, ही विनंती.**

# सातारा जिल्ह्यात खरिपातील १०२ टक्के पेरणी

## सर्वाधिक सोयाबीन, बाजरीला पसंती; दोन लाख ९१ हजार हेक्टरवर पेरणी

**सातारा (प्रतिनिधी) :** जिल्ह्यात खरीप हंगामातील १०२.४२ टक्के क्षेत्रावर पेरणी झाली आहे. या हंगामात शेतकऱ्यांकडून पिकांत सर्वाधिक सोयाबीन व बाजरीला पसंती दिली असल्याचे आकडेवारीवरून स्पष्ट होत आहे.

जिल्ह्यात खरीप हंगामातील पहिल्या टप्प्यात पेरण्या झालेल्या पिकांची भरण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. जिल्ह्यात कृषी विभागाकडून (ऊस वगळून) दोन लाख ९० हजार ९८३ हेक्टर क्षेत्र खरीप पेरणीसाठी नियोजित करण्यात आले होते. त्यापैकी दोन लाख ९१ हजार १३ हेक्टर क्षेत्रावर पेरणी झाली आहे. जिल्ह्यात सर्वाधिक पेरणी पाटण तालुक्यात ५९ हजार ९७६ हेक्टवर झाली आहे.

**तालुकानिहाय पेरणी (हेक्टरमध्ये) : सातारा-३५,६९४, जावळी-१६,००१,पाटण-५९,९७६, कऱ्हाड-४६,७१८, कोरेगाव-२३,१७१, खटाव-३७,८३६, माण -३३,२५९, फलटण-११,९०७, खंडाळा-१३,२५३, वाई-१६,३६८, महाबळेश्वर-३,८३०.**

पिकांत सर्वाधिक सोयाबीनची सर्वाधिक पेरणी झाली आहे.

जिल्ह्यात ५३ हजार ७५० सोयाबीनचे सर्वसाधारण क्षेत्र नियोजित होते. सध्या सोयाबीनची ६० हजार ८७० हेक्टर क्षेत्रावर म्हणजेच ११३.२५ टक्के पेरणी झाली आहे. बाजरी ४९ हजार ५३१ हेक्टर क्षेत्र नियोजित होते. बाजरीची ५३ हजार २९८ हेक्टर क्षेत्रावर पेरणी झाली आहे.

खरीप ज्वारीचे २६ हजार ९४५ हेक्टर सर्वसाधारण क्षेत्र असून, त्यापैकी २२ हजार २९३ हेक्टर क्षेत्रावर पेरणी झाली आहे. मक्याचे १५ हजार ८४४ हेक्टर सर्वसाधारण क्षेत्र असून, मक्याची १७ हजार ६३७ हेक्टर क्षेत्रावर पेरणी झाली आहे. भुईमूग शेंगांचे ४० हजार ४३० हेक्टर सर्वसाधारण क्षेत्र असून, त्यापैकी ३५ हजार ८४५ हेक्टर क्षेत्रावर लागवड झाली आहे. भात लागवड अंतिम टप्प्यात आली आहे. भाताचे ५० हजार ८०५ हेक्टर सर्वसाधारण क्षेत्र असून, त्यापैकी ४६ हजार ९५२ हेक्टर क्षेत्रावर लागवड झाली आहे.